अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपिल क्र. २०/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ४७९३ दि. ९/१०/२०१९

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२०/२०१९

श्रीमती इंदुबाई दादू पवार
सफाईसेविका
घोले रोड क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग
(महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय)
शिवाजीनगर पुणे ५ ------------------- अपिलार्थी

विरुद्ध

१) जन माहिती अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका
२) श्रीमती लीलाबाई दादू पवार
राजीव गांधी झोपडपट्टी वसाहत,
डेंगळे पूल, शिवाजीनगर, पुणे ४११००५

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्रीमती लीलाबाई दादू पवार रा. राजीव गांधी झोपडपट्टी वसाहत, डेंगळे पूल, शिवाजीनगर, पुणे ५ यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे आ.क्र. ३७४३ दि. ०४.०७.२०१९ (स्वागतकक्ष आ.क्र. ४४१६/४३५१ दि. ०३.०७.२०१९) नुसार अर्ज करून "श्रीमती इंदुबाई दादू पवार सफाई सेविका शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रीय कार्यालय यांनी घाणभत्ता वारस नोकरी प्रकरणी सादर केलेली सर्व कागदपत्रे मिळणे बाबत" माहिती मिळणे साठी अर्ज केला होता. त्रयस्त पक्षाची माहिती मागितल्याने जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दि. २४.०७.२०१९ रोजी दोन्ही बाजूचे म्हणने मांडण्यासाठी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणी चा निर्णय जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/३३३१ दि. ३१.०७.२०१९ रोजी दिलेला आहे

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०३.०७.२०१९ | ०३.०७.२०१९ | ०२.०८.२०१९ | ३१.०७.२०१९ | ० |

जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/३३३१ दि. ३१.०७.२०१९ मध्ये . त्रयस्त पक्षाची माहिती माहिती बाबत दिलेल्या निर्णया विरुद्ध त्रयस्त पक्ष श्रीमती इंदुबाई दादू पवार यांनी प्रथम अपील प्राधिकारी यांचेकडे आ. क्र. ६७०२ दि. ३१.०८.२०१९ (स्वागतकक्ष आ.क्र. ७०१४/६९३१ दि. ३०.०८.२०१९) प्रथम अपील अर्ज केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ३०.०८.२०१९ | ३०.०८.२०१९ | ३०.०८.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १६.०९.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्रीमती इंदुबाई दादू पवार रा. सफाईसेविका, घोले रोड क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग, (महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय) शिवाजीनगर पुणे ५ या उपस्थित नव्हत्या. श्री तुकाराम कामथे जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी हे उपस्थित होते. तसेच श्रीमती लीलाबाई दादू पवार रा. राजीव गांधी झोपडपट्टी वसाहत, डेंगळे पूल, शिवाजीनगर, पुणे ५ या उपस्थित होत्या.

## विवेचन

श्री तुकाराम कामथे जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी यांनी दि. २४.०७.२०१९ रोजी दोन्ही बाजूचे म्हणने मांडण्यासाठी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणी चा निर्णय जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/३३३१ दि. ३१.०७.२०१९ रोजी दिलेला आहे व संबंधितांना पाठविण्यात आलेला आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी दि. २४.०७.२०१९ रोजी माहिती अधिकार मधील मूळ अर्जदार श्रीमती लीलाबाई दादू पवार व श्रीमती इंदुबाई दादू पवार यांना दोन्ही बाजूचे म्हणने मांडण्यासाठी सुनावणी आयोजित करून सदर सुनावणी चा निर्णय जा. क्र. जमाअ/आस्था/३३३१ दि. ३१.०७.२०१९ रोजी दिलेला आहे सबब प्रथम अपील क्र. २०/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका